# MINISTRY OF EDUCATION
## Print Media Conversations
### Period of Analysis: 21-02-2024 to 21-02-2024

| Sr. No. | Date | Headline | Publication | Edition | Page no | Journalist | CCM |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 21st Feb 2024 | Ignou gets 5k sqm land for 'har ghar graduate' push | The Times of India | Goa | 3 | | N/A |
| 2 | 21st Feb 2024 | CM allots IGNOU 5k sqm land for 'har ghar post-graduate' dream | The Navhind Times | Goa | 2 | | N/A |
| 3 | 21st Feb 2024 | Advanced education is the need of the hour! Chief Minister's statement at the graduation ceremony of 'IGNOU' A separate campus of IGNOU will be established in Fermagudi. | Tarun Bharat | Goa | 6 | | N/A |
| 4 | 21st Feb 2024 | Look for new opportunities for skill development: Chief Minister IGNOU's Convocation Ceremony: Degrees awarded to students | Dainik Gomantak | Goa | 1 & 14 | | N/A |

Internal (for authorised circulation only)

Downloaded from
SAMVAD

| Sr. No. | Date | Headline | Publication | Edition | Page no | Journalist | CCM |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 21st Feb 2024 | Goal of 'Every Ghar Graduate' possible to be achieved through 'IGNOU': Chief Minister Graduation ceremony of 'IGNOU' Goa branch in excitement | Goan Varta | Goa | 6 | | N/A |
| 6 | 21st Feb 2024 | IGNOU can achieve the objective of 'Graduation for every household': 5,000 sq m land at Farmagudi for Chief Minister's campus | Bhaangarbhuin | Goa | 1 | | N/A |
| 7 | 21st Feb 2024 | Simultaneous dual degree opportunity Chief Minister Dr. Pramod Sawant: Graduation ceremony of 'IGNOU' in excitement | Pudhari | Goa | 8 | | N/A |

Internal (for authorised circulation only)

Downloaded from

SAMVAD

| Publication | The Times of India | Language | English |
|---|---|---|---|
| Edition | Goa | Journalist | |
| Date | 21/02/2024 | Page no | 3 |
| CCM | N/A | | |

# Ignou gets 5k sqm land for 'har ghar graduate' push

# Ignou gets 5k sqm land for 'har ghar graduate' push

## Full-Fledged Campus Soon At Farmagudi: CM

TIMES NEWS NETWORK

**Panaji:** Chief minister Pramod Sawant on Tuesday said that state govt will provide 5,000sqm of land to establish a full-fledged campus of Indira Gandhi National Open University (Ignou) Goa Regional Centre at Farmagudi. Sawant said that after achieving 'har ghar nal se jal' (water supply to every household) and 'har ghar souchalay' (toilet in every household) goals, his govt's aim is to see 'har ghar graduate'. He said that Goa has the potential to achieve the 'har ghar postgraduate' target.

The CM was speaking at the Ignou Panaji centre's 37th convocation ceremony.

"In keeping with govt's aim of skilling, reskilling, and upskilling, Ignou is already offering some innovative programmes in areas such as renewable energy, special education, and sports," Sawant said. "But many used to look at the regional centre of Ignou and get second thoughts. So, we wanted to give it a full-fledged campus. They asked for 4,000sqm, we are giving 5,000sqm in the same location from which NIT-Goa and IIT-Goa functioned."

He said an agreement will be signed soon for the land.

"The regional officers of Ignou should ensure that the campus is constructed at the earliest. Ignou started offering many programmes as defined by the National Education Policy, within two years of the policy being released," Sawant said. "Consistent with the aim of inclusivity of state govt, Ignou is not only offering programmes in special education but also offering programmes for special children."

The chief minister said that many in Goa tend to stop their education after graduation but Ignou presents opportunities to all to pursue higher education and upgrade their skills through distance education programmes. He said that the National Education Policy has eliminated the misperception that only full-fledged college programmes are acceptable.

On Tuesday, 1,363 degrees were awarded by the Panaji regional centre to those who completed their courses with December 2022 and June 2023 term-end examinations.

Ignou helps all who wish to study further, said Kameshwari Moorty, the regional director of the Ignou Panaji centre.

Regional deputy director G Shrinivas said that Ignou is the world's biggest university, awarding lakhs of degrees every year and students in Goa should take advantage of the programmes.

Altogether, 3.3 lakh degrees were presented across the country simultaneously with Vice-President Jagdeep Dhankhar as the chief guest at the convocation ceremony held on the main campus of Ignou in Delhi. Over 39 regional centres organised similar ceremonies around India.



The CM at the Ignou Panaji centre's 37th convocation ceremony

Internal (for authorised circulation only)

Downloaded from SAMVAD

| | | | |
|---|---|---|---|
| Publication | The Navhind Times | Language | English |
| Edition | Goa | Journalist | |
| Date | 21/02/2024 | Page no | 2 |
| CCM | N/A | | |

# CM allots IGNOU 5k sqm land for 'har ghar post-graduate' dream

## CM allots IGNOU 5k sqm land for 'har ghar post-graduate' dream

**Staff Reporter**
Panaji



Chief minister Sawant attended the 37th convocation ceremony of the IGNOU Goa Centre held at Dona Paula.

The permanent campus of the regional centre of the Indira Gandhi National Open University (IGNOU) will come up at Farmagudi in Ponda, for which the state government has allotted 5,000 sq m of land, Chief Minister Pramod Sawant announced on Tuesday.

The regional centre of IGNOU in Panaji has the jurisdiction of four districts: North and South Goa, Sindhudurg in Maharashtra, and Uttar Kannada in Karnataka. There are 10 active study centres in the region, one of which is the central jail in Colvale.

"If they establish it at the earliest, then in addition to 'har ghar nal se jal', 'har ghar shouchalay', and 'har ghar fibre', Goa will also have 'har ghar graduate'. I would like to go a step ahead and say that there should be 'har ghar post-graduate' in Goa," said Sawant, adding that Farmagudi is a prime location where GEC and colleges like IIT and NIT were functioning.

He said that IGNOU, Goa, had told him that they were operating from a small place and requested 4,000 square metres of land to set up their campus. "But I have given them 5,000 square metres."

"If you consider the Goa University campus, it is huge, and the private universities that will come to Goa in the future will also have huge campuses," said Sawant, speaking at the 37th regional convocation ceremony of the IGNOU Goa Centre held at Dona Paula.

In all, 1,363 degrees were awarded under the Panaji regional centre.

The chief minister said that if the youth have to get ready for Industry 4.0, then they have to opt for courses in sectors like travel, tourism, hospitality, and medical, among others.

"Still, there are many who opt for traditional courses. I would like to tell them that there is a need to opt for degree or diploma courses in tours and travel, tourism and hospitality sectors, medical or wellness sectors, or renewable energy. Innovation is the future. Skilling is the future, and you have to be ready for Industry 4.0. If you want to get ready for this industry, then there is a need for youth to opt for such degrees," he said.

Speaking on the occasion, Dr Kameshwari Moorty, Regional Director, IGNOU Regional Centre, Panaji, said, "Today, 29 per cent of the awardees are each receiving their degree for certificate and for bachelor's degree, followed by 32 per cent in the master's degree programmes. And 43 per cent of the awardees are women. Three jail inmates are also receiving their degrees." "In Goa, we also have many Indian Navy personnel with us. 119 Indian Navy personnel are receiving their degrees today," she said.

Internal (for authorised circulation only)

Downloaded from SAMVAD

| | | | |
|---|---|---|---|
| Publication | Tarun Bharat | Language | Marathi |
| Edition | Goa | Journalist | |
| Date | 21/02/2024 | Page no | 6 |
| CCM | N/A | | |

Advanced education is the need of the hour! Chief Minister's statement at the graduation ceremony of 'IGNOU' A separate campus of IGNOU will be established in Fermagudi.

# प्रगत शिक्षण ही काळाची गरज!

## 'इग्नु' च्या पदवीदान सोहळ्यात मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन : फर्मागुडीत स्थापन होणार इग्नुचा स्वतंत्र कॅम्पस

प्रतिनिधी
पणजी

आजच्या तरुणांना उद्योगांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्वतःला सुसज्ज करावे लागत असल्याने प्रगत शिक्षण ही काळाची गरज आहे. अशावेळी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नु) सारख्या संस्थांच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित अभ्यासक्रम या देशातील तरुणांपर्यंत पोहोचल्यास 'विकसित भारत २०४७' चे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी केले.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या (गोवा शाखा) मंगळवारी दोनापावल येथील इंटरनॅशनल सेंटरमध्ये झालेल्या पदवीदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी १२६३ विद्यार्थ्यांना यंदा इग्नुची पदवी आणि पदविका प्राप्त झाली आहे. त्यापैकी निवडक विद्यार्थ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. इग्नुच्या गोवा शाखेचे संचालक कामेश्वरी मूर्ती आणि अन्य मान्यवरांची त्यावेळी उपस्थिती होती.



पणजी : इग्नुच्या दीक्षांत सोहळ्यात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत.

पुढे बोलताना मुख्यमंत्र्यांनी भारत सरकारने सुरू केलेल्या स्किल इंडिया कार्यक्रमाशी संबंधित प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रम ऑफर केल्याबद्दल इग्नुचे कौतुक केले. इग्नुमध्ये पदवी, पदव्युत्तर तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी देशातील ३२ लाख पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गोव्यातूनही असंख्य विद्यार्थी या विद्यापीठातून शिक्षण घेतात. या विद्यापीठामुळे 'हर घर ग्रॅज्युएशन' हे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी व्यक्त केला.

### इग्नु कॅम्पससाठी ५ हजार चौ. मी. जमीन

गोव्यातून इग्नुत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीही संख्या वाढत आहे. त्यामुळे आता त्यांना वाढीव कॅम्पसची गरज भासू लागली आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी सरकारने फर्मागुडी येथे इग्नुच्या कायमस्वरुपी कॅम्पससाठी ५ हजार चौ. मी. जमीन दिली आहे. शक्य तेवढ्या लवकर गोव्यात इग्नुचा कॅम्पस होणे आवश्यक आहे. पारंपरिक शिक्षणासह कौशल्य विकास आणि प्रगत शिक्षण घेण्याची गरज आहे. कौशल्य विकास शिक्षणासाठी केंद्र सरकारने कौशल्य मंत्रालय स्थापन केले आहे. कौशल्य शिक्षण ही काळाची गरज आहे, असे डॉ. सावंत यांनी सांगितले.

### उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रत्येकाला समान संधी हवी : मूर्ती

यावेळी बोलताना डॉ. मूर्ती यांनी, 'आपल्यापैकी प्रत्येकाला उच्च शिक्षण घेण्यासाठी समान संधी मिळायला हवी. तरीही विविध कारणांमुळे अनेकांना ते मिळत नाही. अशा सर्वांसाठी इग्नूकडे उत्तर आहे, असे सांगितले.


Downloaded from
SAMVAD

| | | | |
|---|---|---|---|
| Publication | Dainik Gomantak | Language | Marathi |
| Edition | Goa | Journalist | |
| Date | 21/02/2024 | Page no | 1 & 14 |
| CCM | N/A | | |

Look for new opportunities for skill development: Chief Minister  IGNOU's Convocation Ceremony: Degrees awarded to students

# कौशल्य विकासाच्या नव्या वाटा शोधा : मुख्यमंत्री

## ‘इग्नू’चा दीक्षांत समारंभ : विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान

**पणजी, ता. २० (प्रतिनिधी):** नवनवीन कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम घेऊन कौशल्य विकासाच्या नव्या वाटा शोधा व शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या पारंपरिक पद्धतीत स्वतःला मर्यादित ठेवू नका, असा कानमंत्र आज मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी विद्यार्थ्यांना दिला. दोनापावला येथील इंटरनॅशनल सेंटरमध्ये आज झालेल्या इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या (इग्नू) ३७ व्या दीक्षांत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने (इग्नू) विविध अभ्यासक्रमांमधून ३ लाखांहून पान १४ वर »

### ‘इग्नू’साठी फर्मागुढीत जमीन

३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्याचा जगात विक्रम निर्माण केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी ‘इग्नू’चे कौतुक केले. फर्मागुढी येथे त्यांची शैक्षणिक संस्था उभारण्यासाठी ‘इग्नू’ला ५००० चौ. मी. जमीन दिली असल्याची घोषणाही त्यांनी केली.

Internal (for authorised circulation only)

Downloaded from
SAMVAD

# कौशल्य विकासाच्या नव्या वाटा शोधा ; मुख्यमंत्री

पान १ वरून

अधिक विद्यार्थ्यांना पदव्या देऊन अनोखा विक्रम केला आहे. 'इग्नू'च्या गोवा केंद्रासह इतर ३८ केंद्रांनी मंगळवारी सकाळी इंटरनॅशनल सेंटर दोनापावला येथे गोव्याचे मुख्यमंत्री आणि १५० पदवी प्राप्तकर्त्यांच्या उपस्थितीत दीक्षांत समारंभ पार पाडला.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत पुढे म्हणाले, की विद्यार्थ्यांना पारंपरिक शैक्षणिक अभ्यासक्रमांवर अवलंबून न राहता आरोग्य तंदुरुस्ती क्षेत्र, टुर्स अँड ट्रॅव्हल्स, आदरातिथ्य, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रातील नवीन कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम निवडावे. जर आपल्याला नवीन रोजगाराच्या संधी मिळवायच्या असतील, तर भविष्यात कौशल्य आणि उच्च कौशल्य असणे आवश्यक असेल. अक्षय ऊर्जा, लॉजिस्टिक इत्यादी क्षेत्रातील पदवींना लवकरच मागणी असेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिट इंडिया' संकल्पनेशी संबंधित विविध अपारंपरिक नवीन अभ्यासक्रम उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी 'इग्नू'चे कौतुक केले. भविष्यात कौशल्य, नवोन्मेष हे सर्वात महत्त्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. याचा विचार करून विद्यार्थ्यांनी नवीन कौशल्ये आणि अभ्यासक्रम शिकले पाहिजेत, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. 'इग्नू'च्या गोवा केंद्र प्रभारी डॉ. कामेश्वरी मूर्ती यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे स्वागत केले. त्या म्हणाल्या, 'इग्नू'तर्फे गोव्यात यावर्षी १०६३ पदवी आणि पदविका जारी करण्यात आल्या आहेत. 'इग्नू'चे हे ३८ वे वर्ष असून ३.२ दशलक्ष विद्यार्थ्यांनी या विद्यापीठात शिक्षण घेतले आहे. यावेळी विद्यार्थ्यांना पदवी आणि पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

Internal (for authorised circulation only)
Downloaded from SAMVAD

| Publication | Goan Varta | Language | Marathi |
|---|---|---|---|
| Edition | Goa | Journalist | |
| Date | 21/02/2024 | Page no | 6 |
| CCM | N/A | | |

## Goal of 'Every Ghar Graduate' possible to be achieved through 'IGNOU': Chief Minister Graduation ceremony of 'IGNOU' Goa branch in excitement

# 'इग्नू'द्वारे 'हर घर ग्रॅज्युएट'चे उद्दिष्ट साध्य करणे शक्य : मुख्यमंत्री

## 'इग्नू'च्या गोवा शाखेचा पदवीदान समारंभ उत्साहात

प्रतिनिधी । गोवन वार्ता

**पणजी :** इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटीमध्ये (इग्नु) अंडरग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट तसेच सर्टिफिकेट कोर्सेससाठी देशभरातील ३.२ दशलक्षाहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गोव्यातील अनेक जण इग्नू विद्यापीठातून शिक्षण पूर्ण करतात. इग्नू विद्यापीठामुळे 'हर घर ग्रॅज्युएट'चे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणाले.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचा (गोवा शाखा) पदवीदान समारंभ दोनापावला येथील इंटरनॅशनल सेंटर येथे झाला. राज्यातील एकूण १,०६३




'इग्नू'च्या पदवीदान समारंभात बोलताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत.

विद्यार्थ्यांना पदवी किंवा डिप्लोमा प्राप्त झाला आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते यातील निवडक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी इग्नूच्या गोवा शाखेच्या संचालक कामेश्वरी मूर्ती आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

गोव्यात इग्नूच्या माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढत आहे. फर्मागुडी येथे सरकारने इग्नू कॅम्पससाठी पाच हजार चौरस मीटर जागा दिली आहे. कौशल्य शिक्षण ही काळाची गरज आहे, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणाले. इग्नूचे गोवा मुख्यालय एका छोट्या भागात आहे. इग्नूने सरकारकडे ४ हजार चौरस मीटर जागेची मागणी केली होती. सरकारने फर्मागुडी येथे ५ हजार चौरस मीटर जमीन दिली आहे. इग्नू हे सर्वाधिक अभ्यासक्रम चालविणारे जगातील सर्वांत मोठे विद्यापीठ असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

Internal (for authorised circulation only)

Downloaded from SAMVAD

| | | | |
|---|---|---|---|
| Publication | Bhaangarbhuin | Language | Marathi |
| Edition | Goa | Journalist | |
| Date | 21/02/2024 | Page no | 1 |
| CCM | N/A | | |

IGNOU can achieve the objective of 'Graduation for every household': 5,000 sq m land at Farmagudi for Chief Minister's campus

# इग्नुच्या माध्यमान 'हर घर ग्रॅज्युएशन' चें उद्दिश्ट साध्य करप शक्य: मुख्यमंत्री

## कॅम्पसा खातीर फर्मागुडयेर 5 हजार चौमि जमीन

भांगरभूंय । प्रतिनिधी

**पणजी :** इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापिठांत (इग्नू) देशांतल्या 32 लाखा परस चड विद्यार्थ्यांनी पदवी, पदव्युत्तर तशेंच प्रमाणपत्र अभ्यासक्रमा खातीर नोंदणी केल्या. गोंयांतूय बरेच जाण इग्नू विद्यापिठांतल्यान शिक्षण पुराय करतात. इग्नू विद्यापिठाक लागून 'हर घर जल' उपरांत 'हर घर ग्रॅज्युएट' हें उद्दीश्ट साध्य करप शक्य जातलें, अशें मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत हांणी सांगलें.



दोना पावल इंटरनॅशनल सेंटरांत इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापिठाचो (गोंय फांटो) पदवीदान सुवाळो जालो. राज्यांतल्या 1 हजार 63 विद्यार्थ्यांक अंदूं इग्नूची पदवी वा पदविका मेळ्ळ्यो. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत हांचे हस्तुकीं वेंचीक विद्यार्थ्यांक प्रमाणपत्रांचें वांटप जालें.

इग्नूच्या गोंय फांट्याचे संचालक कामेश्वरी मुर्ती आनी हेर अधिकारी हाजीर आशिल्ले.

गोयांत लेगीत इग्नोंत शिक्षण घेवपी विद्यार्थ्यांचो आंकडो वाडत आसा. फर्मागुडी हांगा सरकारान इग्नोच्या कॅम्पसा खातीर 5 हजार चौरस मिटर जागो दिला. बेगीनांत बेगीन इग्नूचो कॅम्पस गोंयांत जावपाक जाय. पंरपरीक शिक्षणा सयत कुशळटाय वा ॲडव्हान्स शिक्षण घेवपाची गरज आसा. कुशळटाय शिक्षणा खातीर केंद्र सरकारान कुशळटाय मंत्रालय सुरू केला. कुशळटाय शिक्षण ही काळाची गरज आसा, अशें मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत हांणी सांगलें.

Internal (for authorised circulation only)

Downloaded from SAMVAD

| | | | |
|---|---|---|---|
| Publication | Pudhari | Language | Marathi |
| Edition | Goa | Journalist | |
| Date | 21/02/2024 | Page no | 8 |
| CCM | N/A | | |

## Simultaneous dual degree opportunity  Chief Minister Dr. Pramod Sawant: Graduation ceremony of 'IGNOU' in excitement

# एकाचवेळी दुहेरी पदवीची संधी

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : 'इग्नू'चा पदवीदान सोहळा उत्साहात

- १६६ जणांना डिप्लोमा, पदवीचे प्रमाणपत्र प्रदान
- स्वप्न साध्य करण्याची संधी

**पणजी : पुढारी वृत्तसेवा**

युवकांनी एकच पदवी घेऊन समाधानी न राहता एकापेक्षा जास्त पदव्या घ्याव्यात व उपलब्ध संधीचा लाभ घेऊन आपली स्वप्ने पूर्ण करावीत. यासाठी गोवा सरकार येत्या काळामध्ये एकाच वेळी दुहेरी पदवी घेण्याची संधी उपलब्ध करणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी केली.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या (इग्नू) आज मंगळवारी दोनापावला येथे आयोजित ३७ व्या दीक्षांत समारंभ सोहळ्यामध्ये पदवी प्रदान केल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. याप्रसंगी इग्नूच्या विभागीय गोवा केंद्र संचालक डॉ. कामेश्वरी मूर्ती व्यासपीठावर उपस्थित होत्या.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडिया, स्किल इंडिया आणि इन्क्लुजन इंडियाच्या माध्यमातून देशाचा विकास करून देशाला २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचे लक्ष ठेवले आहे. ते ध्येय साध्य होण्यासाठी प्रत्येक व्यक्ती विकसित व्हायला हवा आणि व्यक्ती विकसित होण्यासाठी दुहेरी पदवीही एक लाभदायी ठरू शकते, असे मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्र्याच्या हस्ते १६३ जणांना आज डिप्लोमा आणि पदवीचे प्रमाणपत्र देण्यात आले.



दोनापावला : शिक्षिका सुजाता सुतार यांना पदवी प्रदान करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. बाजूला इग्नूच्या संचालक डॉ. कामेश्वरी मूर्ती.
(छाया : विठ्ठल गावडे-पारवाडकर)

### राज्यात दिव्यांग ४ टक्के

राज्यात सध्याच्या घडीला १९,००० दिव्यांग व्यक्ती असून राज्याच्या लोकसंख्येत दिव्यांग व्यक्ती ४ टक्के आहेत. त्यामुळे दिव्यांगाच्या संबंधातील पदवी घेणाऱ्यांना अनेक संधी राज्यामध्ये उपलब्ध आहेत. राज्यात आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्टचे आयोजन करण्यात आले जे जगातील एकमेव फेस्ट ठरले, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**फिट इंडियाचे कोर्स इग्नूमध्ये**

फिट इंडियाशी संलग्न अनेक कोर्स इगनू मध्ये उपलब्ध आहेत. ही आनंदाची बाब असून पहिल्यांदा देशात २०१४ मध्ये कौशल मंत्रालय स्थापन झाल्यानंतर सर्वच राज्यांमध्ये कौशल्य मंत्रालये स्थापन झाली. त्यांच्या माध्यमातून अनेक नवे कोर्स सुरू झाल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**नव्या क्षेत्रातील पदव्या घ्या**

सध्याच्या काळामध्ये लॉजिस्टिक, अपारंपरिक ऊर्जा (रिनीवेलेबल एनर्जी), टुरिझम वेलनेस, टुर अन ट्रावेल अशा विविध क्षेत्रामध्ये पदव्या घेण्याची संधी उपलब्ध असून त्या पदव्यामुळे मोठ्या प्रमाणात कौशल्याचा विकास होतोच पण नोकरीच्या संधी उपलब्ध होऊन आपले स्वप्न साध्य करण्याची संधीही मिळते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**'इग्नू'साठी ५ हजार चौ.मी. जागा देणार**

इग्नू शिक्षण संस्था चांगले काम करत आहे. या संस्थेला स्वतःचे कॅम्पस स्थापन करण्यासाठी फर्मागुडी येथे ५ हजार चौ.मी. जागा सरकार देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यानी यावेळी केली.

********

Internal (for authorised circulation only)

Downloaded from
SAMVAD